5 AUG 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अर्थव्यवस्थेचा प्रवास स्थिरतेच्या दिशेने

## डॉ. सुशांत मलिक : सायबरमध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेत मार्गदर्शन

कोल्हापूर, ता. ४ : देशातील ८६ टक्के चलन अचानक रद्द झाल्याने भारतातील अनौपचारिक क्षेत्रास झळ पोहचली आहे. चलन पुरवठा कमी झाल्याने अर्थव्यवस्थेचा प्रवास स्थिरतेच्या दिशेने जात आहे, असे मत लंडन येथील क्वीन मेरी युनिव्हर्सिटीचे डॉ. सुशांत मलिक यांनी आज व्यक्त केले.

सायबर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रमुख वक्ते म्हणून डॉ. मलिक बोलत होते. निर्मलीकरण, पुनर्मूल्यीकरण आणि जागतिक व्यवसायांचे प्रश्न व आव्हाने या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन उपकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. अर्थसांख्यिकी (इकॉनॉमिट्रीक्स) पध्दतीने वैश्विक स्तरावरील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारतातील आर्थिक उलाढालीसंदर्भात त्यांनी माहिती दिली. डॉ. मलिक म्हणाले, "देशाच्या अनिश्चितता निर्देशांक पाहता २०१७ मध्ये गुंतवणूकदारांना पोषक वातावरण झाले आहे. देय रक्कमेचा परतावा सध्या चांगला सुधारला आहे. औपचारिक अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक समावेशकतेच्या माध्यमातून पारदर्शकता व औपचारिक अर्थव्यवहार सुधारल्यानंतरच सकारात्मक चित्र दिसेल. नोटबंदीचा अनपेक्षित धक्क्यामुळे अनौपचारिक व अन्नपदार्थांच्या तसेच प्राथमिक क्षेत्रातील किमतीवर परिणाम झाला असून त्याची झळ बसली आहे. अर्थ व्यवस्थेच्या नियमितीकरणाची ही नवी सुरवात आहे. दूरगामी विचार करता हे परिणाम इतके दाहक किंवा त्रास दायक ठरणार नाहीत. आर्थिक समावेशन करण्याच्या धोरणातून हळू-हळू ही परिस्थिती सुधारेल." उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांनाही त्यांनी उत्तर दिले. वाढलेली पारदर्शकता व डिजिटल व्यवहारातही अर्थपूर्ण वाढ हे चांगले चित्र असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी, अध्यक्ष ॲड. श्रीपतराव शिंदे, कार्यकारी विश्वस्त व सचिव डॉ. रणजित शिंदे, ऋषिकेश शिंदे, डॉ. टी. ए.शिवारे, बलविंदर सिंग, डॉ. मोहम्मद इकबाल अली, डॉ. व्ही. बी. काकडे उपस्थित होते. डॉ. एम. एम. अली यांनी प्रस्तविक केले. समन्वयक डॉ. उमेश देशमुख यांनी आभार मानले.




**कोल्हापूर : सायबर येथे जागतिक व्यवसायांचे प्रश्न व आव्हाने याविषयीच्या परिषदेचे उद्घाटन करताना उपस्थित तज्ज्ञ व मान्यवर.**

5 AUG 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अर्थव्यवहार सुधारणेने सकारात्मक बदल शक्य

## डॉ. सुशांत मलिक यांचे मत : सायबरमधील आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारताचा अनिश्चितता निर्देशांक तपासून पाहता गुंतवणुकदारांना पोषक वातावरण निर्माण झाले आहे व देय रकमेचा परतावा सुधारला आहे. त्यामुळेच औपचारिक अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक समावेशकतेच्या माध्यमातून पारदर्शकता व औपचारिक अर्थव्यवहार सुधाल्यानंतरच सकारात्मक चित्र दिसेल, असे मत लंडन येथील क्वीन मेरी युनिव्हर्सिटीचे डॉ. सुशांत मलिक यांनी केले. सायबर येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये ते बोलत होते.

सायबर कॅम्पस येथे शुक्रवारपासून छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अॅन्ड रिसर्चच्या वतीने निर्मुल्यीकरण व पुनर्मुल्यीकरण 'जागतिक व्यवसायांचे प्रश्न व आव्हाने' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेला प्रमुख वक्ते म्हणून प्रो. इंटरनॅशनल फायनान्स क्वीन मेरी युनिव्हर्सिटी–लंडन येथील डॉ. सुशांत मलिक हे उपस्थित होते. तर इंडियन कॉमर्स असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी बलविंदर सिंग आणि तेलंगणा येथील सातवाहन विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मोहम्मद अली यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अर्थसांख्यिकी पध्दतीने वैश्विक स्तरावरील घडामोडीच्या पार्श्वभूमीवर भारतातील आर्थिक उलाढालीसंदर्भात डॉ. सुशांत मलिक यांनी आपले विचार मांडले. ते म्हणाले, देशभरातील ८६ टक्के चलन अचानक रद्द होण्याने भारतातील अनौपचारिक क्षेत्राला झळ पोहोचली असून चलन पुरवठा कमी झाला आहे. परिणामी अर्थवस्थेचा प्रवास स्थिरतेच्या दिशेने जातो आहे.



कोल्हापूर : सायबरमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनाप्रसंगी इंडियन कॉमर्स असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी बलविंदर सिंग. सोबत डावीकडून मोहम्मद इकबाल अली, डॉ. सुशांत मलिक, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. टी. ए. शिवारे व अॅड. श्रीपतराव शिंदे.

ते पुढे म्हणाले, नोटाबंदी हा अनपेक्षित धक्का असल्यामुळे अनौपचारिक क्षेत्रांवर आणि अन्न पदार्थांच्या तसेच प्राथमिक क्षेत्रांच्या किमतीवर परिणाम झाला असून त्याची बरीच झळ बसली आहे. अर्थव्यवस्थेच्या नियमितीकरणाची ही नवी सुरुवात त्यानिमित्ताने झाली असून दूरगामी परिणामांचा विचार करता हे परिणाम इतके दाहक किंवा त्रासदायक ठरणार नाहीत. आर्थिक समावेशन करण्याच्या धोरणातून हळूहळू ही परिस्थिती सुधारेल, असे वातावरण तयार होत आहे. वाढलेली पारदर्शकता व डिजिटल व्यवहारतही अर्थपूर्ण वाढ हे चांगले लक्षण असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, या परिषदेचे उदघाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी सायबर ट्रस्टचे अध्यक्ष अॅड. श्रीपतराव शिंदे, कार्यकारी विश्वस्त डॉ. रणजित शिंदे, ऋषिकेश शिंदे, डॉ. टी. ए. शिवारे, डॉ. व्ही. बी. ककडे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. एम. एम. अली यांनी प्रास्ताविक तर समन्वयक डॉ. उमेश देशमुख यांनी आभार मानले. याप्रसंगी बलविंदर सिंग यांनी सायबरच्या या उपक्रमाचे स्वागत केले. तीन सत्रात विविध संशोधकांचे प्रबंध वाचन व पॅनेल चर्चा झाली.

या परिषदेत अर्थशास्त्रविषयाचे १०० अभ्यासक उपस्थित होते. या परिषदेचा समारोप उद्या (ता. ५) अर्थशास्त्राचे अभ्यासक डॉ. जे. एफ. पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे.

### अनिश्चितता निर्देशांक स्थिर असणे गुंतवणुकीला पोषक

भारताच्या गुंतवणुकीच्या अनुषंगाने अनिश्चितता निर्देशांक स्थिर आहे आणि तो कमी होत आहे. हा अनिश्चितता बिंदू कमी होणे, हे गुंतवणुकीला पोषक असेच आहे, असेही निरीक्षण डॉ. मलिक यांनी नोंदवले.

### सर्वसामान्यांनी औपचारिक अर्थव्यवस्थेवर भर द्यावा

डॉ. सुशांत मलिक यांनी सांगितले की, औपचारिक अर्थव्यवस्थेत बँक व्यवहार करणे, इन्शुरन्स काढणे वा गुंतवणूक करणे याचा समावेश होतो. याचा अर्थ केवळ टॅक्स भरण्यापूरता व्यवहार असा होत नाही. तर व्यवस्थेचा एक भाग होणे असाही आहे. तर अनौपचारिक अर्थव्यवस्थेत बँकेत खाते नसणे, बँकमार्फत व्यवहार न करणे, रोकड व चलनाच्या वापरावर भर देणे, बँकेत पैसे न ठेवणे, असे व्यवहार रेकॉर्डवर दिसत नाहीत. त्यामुळे सर्वसामान्यांनी औपचारिक अर्थव्यवस्थेवर भर द्यावा.

सध्या निर्मुल्यीकरणाचे अल्पकालीन परिणाम गंभीर दिसत असले तरी दीर्घकालीन परिणाम चांगले असून गुंतवणुकीला पोषक असणार आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

-5 AUG 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अपेक्षित परिणाम अस्पष्टच

## सायबरमध्ये नोटबंदीबाबतच्या परिसंवादात प्रा. डॉ. सुशांत मलिक यांचे मत

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'देशभरातील ८६ टक्के चलन अचानक रद्द होण्यामुळे भारतातील अनौपचारिक क्षेत्रास झळ पोहोचली आहे. चलन पुरवठा कमी झाल्याने अर्थव्यवस्थेचा प्रवास स्थिरतेकडे जात आहे. मात्र अद्याप अपेक्षित परिणाम अस्पष्टच आहेत,' असे प्रतिपादन लंडन येथील क्वीन मेरी विद्यापीठाचे प्रा. डॉ. सुशांत मलिक यांनी केले. छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्च (सायबर) येथे निर्मूल्यीकरण व पुनर्मूल्यीकरण... जागतिक व्यवसायांचे प्रश्न व आव्हाने या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या जागतिक परिषदेत ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते या परिषदेचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. बी. पी. साबळे होते. तेलंगणा येथील सातवाहन विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. मेहमद इकबाल अली उपस्थित होते.

अर्थसांख्यिकी पद्धतीने वैश्विकस्तरावरील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर देशातील उलाढालीविषयी बोलताना डॉ. मलिक म्हणाले, 'यावर्षी गुंतवणूकदारांना पोषक वातावरण निर्माण झाले आहे. तसेच देय रकमेचा परतावा सुधारला आहे. यामुळेच औपचारिक अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक समावेशकतेच्या माध्यमातून पारदर्शकता आणि औपचारिक अर्थव्यवहार सुधारल्यानंतरच सकारात्मक चित्र दिसेल. नोटबंदीमुळे रद्द झालेल्या चलनाचा परिणाम झाला असला तरी अर्थव्यवस्थेला शिस्त येण्याची ही सुरूवात आहे. याचा दूरगामी परिणाम विचारात घेता, हे परिणाम दाहक किंवा त्रासदायक ठरणार नाहीत. आर्थिक समावेशन करण्याच्या धोरणातून ही परिस्थिती सुधारेल, असे वातावरण तयार होत आहे. आर्थिक व्यवहारात आलेली पारदर्शकता आणि डिजिटल व्यवहाराकडे वाढलेला कल हे योग्य संकेत आहे, असेही डॉ. मलिक यांनी स्पष्ट केले.




अर्जुन टाकळकर

**सायबर येथे 'निर्मूल्यीकरण आणि पुनर्मूल्यीकरण... जागतिक व्यवसायांचे प्रश्न व आव्हाने,' या विषयावर आयोजित जागतिक परिषदेत बोलताना डॉ. सुशांत मलिक. समोर उपस्थित अर्थशास्त्रातील तज्ज्ञ व मान्यवर.**

यावेळी संस्थेचे अध्यक्ष अॅड. श्रीपतराव शिंदे, विश्वस्त व सचिव डॉ. रणजित शिंदे, विश्वस्त ऋषिकेश शिंदे, डॉ. टी. ए. शिवारे, अमृतसर येथील इंडियन कॉमर्स असोसिएशनचे सचिव डॉ. बलविंदर सिंग. डॉ. व्ही. बी. काकडे आदी उपस्थित होते. परिषदेच्या व्यासपीठावर तीन सत्रांमध्ये विविध संशोधकांचे प्रबंध वाचन व पॅनल चर्चा झाली.

डॉ. एम. एम. अली यांनी प्रास्ताविक केले. डॉ. राजेंद्र पारिजात, डॉ. ए. आर. कुलकर्णी, डॉ. बिंदू मेनन यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. डॉ. उमेश देशमुख यांनी आभार मानले. परिषदेच्यानिमित्ताने शंभरहून अधिक संशोधक कोल्हापुरात आले असून शनिवार दि. ५ ऑगस्ट रोजी अर्थतज्ज् डॉ. जे. एफ. पाटील यांच्या उपस्थितीत परिषदेचा समारोप होणार आहे.

जनसंपर्क कक्ष

5 AUG 2017 Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Varsity participates in Swachhta ranking drive

File photo



SUK has adopted a village and is planning to carry out various activities with regard to cleanliness and hygiene

**Piyush.Bhusari**
@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) participated in the Swachhta ranking drive organized by the University Grants Commission (UGC).

A circular dated August 1 from the UGC said that the academic and administrative staff should keep their respective premises clean.

D T Shirke, acting pro-vice chancellor of SUK, told **TOI** that a meeting under the chairmanship of vice-chancellor Devanand Shinde was conducted earlier last week regarding the issue. The instructions have been passed on to respective departments on the campus.

A cleanliness drive was instructed to be organized on July 29, across 30 departments on the campus.

"I have personally visited the university's hostels and have asked the concerned authorities to look after the criteria which are mentioned in the Swachhta ranking," he said.

When asked if the UGC committee or any representative will be visiting the university to inspect cleanliness, Shirke said that there has been no formal communication about it. The committee might even keep the information of their visit a secret to get to know the real picture of the campus.

He added that the university has already adopted a village and is planning various activities with regard to hygiene.

The criteria for judging the ranking is primarily based on hygiene inside the campus, which contain a weightage of 85%.

The in-campus hygiene includes—availability of toilets in the hostels and academic buildings, condition of the toilets, maintenance, running water facility, garbage clearance, innovative technology for solid and liquid waste management, hostel kitchen hygiene, and availability of cooking gas.

Outside campus activity holds 15% weightage and hence it is also important. It includes adoption of any nearby village, and awareness about hygiene.

Facilities such as water storage, pipeline system, quality of drinking water and hostel green cover will also play a pivotal role in the in-campus hygiene criteria.

5 AUG 2017 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'पॅरासिटॅमॉल'च्या अतिवापराने यकृताचा आजार - डॉ. उदयन आपटे

प्रतिनिधी, कोल्हापूर

**थंडी, तापावर** वापरल्या जाणाऱ्या 'पॅरासिटॅमॉल' या औषधाच्या अतिवापरामुळे यकृत निकामी होते. त्यामुळे त्यांचा अतिवापर टाळावा, असा सल्ला अमेरिकेतील डॉ. उदयन आपटे यांनी गुरुवारी येथे दिला.

शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्र अधिविभागामध्ये 'ओव्हर डोस ऑफ पॅरासिटॅमॉल कॉझेस लिव्हर इंजुरी' या विषयावर आयोजित व्याख्यानामध्ये ते बोलत होते. डॉ. आपटे हे अमेरिकेतील कनसास विद्यापीठामधील फार्माकॉलॉजी टॉक्सीकॉलॉजी विभागामध्ये कार्यरत आहेत.

डॉ.आपटे पुढे म्हणाले, मोठ्या माणसांना प्रतिदिन जास्तीत जास्त चार ग्रॅम पॅरासिटॅमॉल घेतले असता चालू शकते, परंतु त्यापेक्षा जास्त डोस हा यकृताला घातक ठरू शकतो. पंधरा वर्षांच्या संशोधनानंतर असे प्रमाणित झाले आहे की, जी.एफ. आर ( इपिडर्मल ग्रोथ फॅक्टर रिसेप्टर ) हे यकृताच्या रिजनरेशनमध्ये अतिमहत्त्वाचे काम करते.

जी.एफ. आर हे पॅरासिटॅमॉलमुळे लगेच सक्रिय झाले तर त्याचा यकृतांच्या पेशींच्यावर दुष्परिणाम होतो. ते सक्रिय झाले तर यकृतांच्या पेशींवर चांगला परिणाम दाखवून यकृताच्या रिजनरेशनमध्ये उपयोगी पडते असे मत व्यक्त केले.

विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. माधुरी वाळवेकर यांनी केले. तसेच, या कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. डी. व्ही. मुळे , प्रा. ग. प. भवाने, डॉ. शांताकुमार मन्ने, डॉ. एस. आर. यंकची, डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. ए. डी. जाधव, डॉ. ए. ए. देशमुख, डॉ. एन. के. कांबळे, डॉ. एम. पी. भिलावे, डॉ. एम. जी. जोशी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 AUG 2017
तरुण भारत

# पॅरासिटॅमॉलचा अतिवापर यकृतास हानीकारक

प्रतिनिधी
कोल्हापूर

थंडी तापावर वापरल्या जाणाऱ्या पॅरासिटॅमॉल या औषधाच्या अतिवापरामुळे यकृत निकामी होते. त्यामुळे पॅरासिटॅमॉलचा अतिवापर टाळावा, असे आवाहन अमेरिकेतील डॉ. उदयन आपटे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागामध्ये 'ओव्हर डोस ऑफ पॅरासिटॅमॉल कॉझेस लिव्हर इंजुरी' या विषयावरील आयोजित व्याख्यानामध्ये ते बोलत होते. डॉ. आपटे हे अमेरिकेतील कनसास विद्यापीठामधील फार्माकॉलॉजी टॉक्सीकॉलॉजी विभागामध्ये कार्यरत आहेत.

डॉ. आपटे म्हणाले, मोठ्या माणसांनी प्रतिदिनी चार ग्रॅम पॅरासिटॅमॉल घेतले असता चालू शकते, परंतु त्यापेक्षा जास्त डोस हा यकृताला घातक ठरू शकतो. पंधरा वर्षांच्या संशोधनानंतर हे सिद्ध झाले आहे. इ. जी. एफ. आर (इपिडर्मल ग्रोथ फॅक्टर रिसेप्टर) हे यकृताच्या रिजनरेशन मध्ये अतिमहत्वाचे काम करते. जर इ. जी. एफ. आर हे पॅरासिटॅमॉलमुळे लगेच ॲक्टीविट झाले तर त्याचा यकृतांच्या पोशींदार दुष्परिणाम होतो. जर इ. जी. एफ. आर हळू ॲक्टीविट झाले तर यकृताच्या रिजनरेशन मध्ये उपयोगी पडते. विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. माधूरी वाळवेकर यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डॉ. डी.व्ही. मुळे, प्रा. ग. प. भवाने, डॉ. शांताकुमार मन्ने, डॉ. एस. आर. यंकची, डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. ए. डी. जाधव, डॉ. ए. ए. देशमुख, डॉ. एन. के. कांबळे, डॉ. एम. पी. भिलावे, डॉ. एम. जी. जोशी आदी उपस्थित होते.

**अमेरिकेतील डॉ. उदयन आपटे यांची माहिती**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 AUG 2017
महाराष्ट्र टाईम्स

## 'औषधाचा अतिवापर टाळा'

**कोल्हापूर :** थंडी तापावर वापरल्या जाणाऱ्या पॅरासिटॅमॉल या औषधाच्या अतिवापरामुळे यकृत निकामी होते.



त्यामुळे त्यांचा अतिवापर टाळावा, असे आवाहन डॉ. उदयन आपटे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागात 'ओव्हर डोस ऑफ पॅरासिटॅमॉल कॉझेस लिव्हर इंजुरी,' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. डॉ. आपटे हे अमेरिकेतील कनसास विद्यापीठाच्या फार्माकॉलॉजी टॉक्सीकॉलॉजी विभागात कार्यरत आहेत. ते म्हणाले, 'प्रौढ व्यक्तीने दिवसाला जास्तीत जास्त चार ग्रॅम पॅरासिटॅमॉल घेतले तर चालू शकते, परंतु त्यापेक्षा जास्त डोस यकृतासाठी घातक ठरू शकतो. कार्यक्रमाचे आयोजन विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. माधुरी वाळवेकर यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 AUG 2017
महाराष्ट्र टाईम्स

# मेहता स्मृती व्याख्यानांतर्गत दिवाण यांचे व्याख्यान

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'चंपारण्य सत्याग्रह ही महात्मा गांधीजींची सामाजिक आंदोलनाची प्रयोगशाळा ठरली,' असे प्रतिपादन ज्येष्ठ-विचारवंत जयंत दिवाण यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये डॉ.उषा मेहता स्मृती व्याख्यानांतर्गत 'चंपारण्य लढ्याची शतकपूर्ती' या विषयावर दिवाण यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी डॉ.अशोक चौसाळकर हे उपस्थित होते.

दिवाण पुढे म्हणाले, 'चंपारण्य सत्याग्रहाला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. चंपारण्यामध्ये लोकांवर अन्याय होत होता. निळीची शेती करुन त्याच्या पानापासून रस निर्माण करण्यात येत होता. चंपारण्य हे वसाहतवादाचे छोटेसे उदाहरण होते. कच्च्या मालापासून पक्का माल तयार करुन त्याच्यामधून फायदा करुन घेणे हे त्या ठिकाणी घडत होते. त्यावेळी पूर्व आणि पश्चिम चंपारण्य असे भाग नसून ते पूर्ण होते. त्याठिकाणी ७२ कोठीवाले म्हणजे ब्रिटीश लोकांची मक्तेदारी मोठ्या प्रमाणात होती. निळ पेरण्यासाठी शेतकऱ्यांवर अन्याय, अत्याचार आणि जुलूम केले जात होते. या शोषणा विरुध्द लढा देण्यासाठी गांधीजींनी प्रयत्न सुरु केले. माणसांच्या मनाची उभारी या कोठीवाल्यांनी संपवली होती. सातत्याने स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये लिखाण होवूनही त्यावर मार्ग निघत नव्हते. अशा परिस्थितीत महात्मा गांधीजी त्या ठिकाणी गेले आणि त्यांच्या चंपारण्य येथील वैशिष्टपूर्ण लढ्यामुळे हे आंदोलन एक सामाजिक आंदोलन ठरले. नवीन समाज घडविण्यासाठी गांधीजींनी या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले. भारतीय स्वातंत्र्याची ती एक प्रयोगशाळाच ठरली.'

अध्यक्षस्थानावरुन बोलताना डॉ.अशोक चौसाळकर म्हणाले, 'भारतामध्ये बिहार आणि बंगाल येथे निळीचे उत्पादन घेण्यात येत होते. यामुळे ब्रिटीशांची आर्थिक पकड येथील साम्राज्यावर घट्ट होत गेली. ती महात्मा गांधीजींच्या चंपारण्य येथील तीव्र लढ्यापुढे निष्फळ ठरली.'

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.भारती पाटील यांनी केले. आभार डॉ.प्रकाश पवार यांनी मानले. यावेळी डॉ.भगवानराव माने, अवनिश पाटील यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 AUG 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त प्रभारी प्र-कुलगुरू डॉ.डी. टी. शिर्के यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनिश पाटील, डॉ. निलांबरी जगताप यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 AUG 2017
महाराष्ट्र टाईम्स

## क्रांतिसिंहांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनिश पाटील, डॉ. नीलांबरी जगताप आदी उपस्थित होते.